दै. प्रजावाणी दि. 16/03/2024

# लोहा पोलिसांची जुगार अड्ड्यांवर धाड



## १ लक्ष ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; ७ जणांवर गुन्हा

लोहा, (वार्ताहर) दि. १५ : लोहा शहरातील अवैध धंदे बंद करण्यासाठी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. नव्याने रुजू झालेले पीएसआय रोडे यांनी धाडसी एन्ट्री केली आहे. सुनेगाव ते हळदव पांदण रस्त्यावर पत्याच्या अड्ड्यावर धाड टाकली. त्यात १ लाख ३३ हजार ९०० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. यात ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर बुधवारी टाकण्यात आलेल्या छाप्यातील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक चिंचोलकर हे अवैध धंद्यावरील कारवाईसाठी ॲक्शनमोडवर आहेत. त्यामुळे शहरातील अवैध व्यावसायिक धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. सलग दोन दिवसांपासून धाडसत्र सुरु आहे. गुरुवार दि. १४ मार्च रोजी दुपारी हळदव-सुनेगाव पांदण रस्त्यावर एका लिंबाच्या झाडाखाली सातजण पत्ते खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहिती आधारे नव्याने रुजू झालेले पोलीस उपनिरीक्षक रोडे तसेच जमादार लाडेकर, डफडे, पोलीस कर्मचारी राठोड, गुट्टे, डीएसबीचे गिरे यांच्या पथकाने तेथे धाड टाकली. या धाडीत तीन आरोपींना पोलिसांनी पकडले तर चारजण पोलिसांना पाहून झाडाझुडपात पळून गेले. यात पोलिसांनी दोन मोटार सायकल, रोख रक्कम जप्त केल्या. पीएसआय रोडे यांच्या तक्रारीवरून महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे पोलीस स्टेशन लोहा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. १३ तारखेला शहरातील सहारा मैदानाजवळ लोहा पोलिसांनी एका जुगार अड्ड्यावर छापा टाकला होता. यात २ आरोपींना अटक केली व गुन्हा दाखल केला. यावेळी २९, हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे लोहा तालुक्यातील अवैध धंदेचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# जांब येथे जुगारींकडून ६७ हजार जप्त

## स्थागुशाची कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील जांब बु.येथील बसस्थानकाजवळ हाडोळती जाणाऱ्या रस्त्यावर स्थागुशाच्या पथकाने धाड टाकून ७ जुगारींवर कारवाई करीत ६७ हजार ८८० रुपयांची रोकड जप्त केली. ही कारवाई १४ मार्च रोजी सकाळी १० वाजता करण्यात आली.

मुखेड तालुक्यातील जांब बु. येथील हाडोळती जाणाऱ्या रस्त्यावर स्थागुशाच्या पथकाने विश्वनाथ गाढवे यांच्या शट्टरमध्ये धाड टूकन विना परवाना जुगार खेळणाऱ्या ७ जणांवर कारवाई केली. यात ६७ हजार ८८० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांच्या तक्रारीवरुन मारोती कटळे रा.हनुमान मंदिर मुखेड, विश्वनाथ गाढवे, रा. गाढवेवाडी ता.मुखेड, अलीम मुर्तुजा अहमद तांबोळी, नवीन बसस्थानक जळकोट जि.लातूर, माधव गव्हाणे रा.जाब ता. मुखेड, बडन बेग करीमसाब कोतवाल, रा.अण्णाभाऊ साठे चौक जळकोट जि. लातूर, मो.रज्जाक पिंजारी रा.केकची ता. जळकोट जि. लातूर, गजानन पोतलवाड रा.मुखेड या ७ जणांविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गुरनं ८५/२४ नोंदविण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक राठोड अधिक तपास करीत आहेत.

→ पुण्यनगरी